


दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ९६ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । २१/०४/२०२६ । पाने - ६




# अंधश्रद्धा पसरणाऱ्या व्यक्तीच सामाजिक कॅन्सरच्या गाठी

## अंनिस आशा गाठी फोडण्याचे काम करणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चमत्कारांच्या नावाखाली सर्वसामान्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण करणाऱ्या भोंदूगिरीला संगमनेरात अखेर लगाम बसला आहे. संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील तथाकथित 'दत्त धाम सरकार'चे साम्राज्य पोलिसांनी रविवारी सील करत प्रमुख आरोपी राजेंद्र गडगे याला अटक केली. या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून अंधश्रद्धेविरोधातील लढ्याला नवे बळ मिळाले आहे.



अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या फिर्यादीनंतर पोलिसांनी कडक बंदोबस्तात ही कारवाई केली. अंधश्रद्धेच्या आडून चालणाऱ्या या भोंदूगिरीचा पर्दाफाश करताना पोलिसांनी आश्रम परिसराची सखोल तपासणी केली. पुरावे नष्ट होऊ नयेत आणि तपासात अडथळा येऊ नये यासाठी 'दत्त धाम'ला टाळे ठोकण्यात आले आहे.

या कारवाईवेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सचिव ॲड. रंजना गवांदे उपस्थित होत्या. तसेच पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे, उपनिरीक्षक शलमोन सातपुते, विकास काळे, तालुका आरोग्य अधिकारी यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

कारवाईपूर्वी शनिवारी रात्री पोलिसांनी गडगे याला सुकेवाडी रोडवरील 'मिरा हॉटेल' येथे नेऊन तपास केला. या ठिकाणी काही महत्त्वाचे पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाला का, याचा शोध पोलीस घेत आहेत. या प्रकरणाचा तपास सध्या गोपनीय ठेवण्यात आला असून पुढील काही दिवसांत आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीवर खंडणीचे आरोप झाल्यानंतरही त्यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेमुळेच ही कारवाई शक्य झाल्याचे बोलले जात आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे केवळ एका भोंदूगिरीचा पर्दाफाश झाला नसून समाजातील अंधश्रद्धेविरुद्ध लढण्याचा स्पष्ट संदेश गेला आहे. ही कारवाई केवळ एका प्रकरणापुरती मर्यादित नसून समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन बळकट करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरत असल्याचे जाणकारांचे मत आहे.



व्यंगचित्र - अरविंद गाडेकर

### 'दैवी शक्ती' चा दावा; माध्यमांशी उद्धट वर्तन

पोलीस कोठडीत असताना राजेंद्र गडगे याने माध्यमांसमोर आक्रमक भूमिका घेत माझ्यात दैवी शक्ती आहे असा दावा पुन्हा केला. कर्करोगासारखे गंभीर आजार बरे करण्याबाबत विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे देत स्वतःवर अन्याय होत असल्याचा आरोप केला. याचबरोबर सनातन धर्मावर घाला आहे असे म्हणत धर्माच्या आड लपण्याचा प्रयत्नही त्याने केला.



### अंधश्रद्धा म्हणजे 'सामाजिक कॅन्सर'

धर्म व श्रद्धेच्या नावाखाली अंधविश्वास पसरवणारे लोक हे समाजासाठी 'कॅन्सरच्या गाठी'प्रमाणे आहेत, अशा तीव्र शब्दांत अंधश्रद्धा निर्मूलन समितीने प्रतिक्रिया दिली. अशा प्रवृत्तींचा वेळीच बंदोबस्त करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या तथाकथित बाबाकडून आर्थिक फसवणूक, लैंगिक शोषण किंवा अन्य प्रकारचा त्रास सहन केलेल्या नागरिकांनी भीती न बाळगता पुढे येऊन तक्रार करावी असे आवाहन ॲड. रंजना गवांदे यांनी केले आहे. विज्ञानाच्या युगात अंधश्रद्धेच्या आहारी जाऊ नये असा संदेशही त्यांनी दिला.

# संगमनेर नगरपरिषदेची स्वच्छता मोहिम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहराच्या झपाट्याने वाढणाऱ्या विकासाला स्वच्छतेची जोड देत संगमनेर नगर परिषदेकडून मालदाडरोड परिसरात आज सोमवारी सकाळी भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. आमदार सत्यजित तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे, मुख्याधिकारी दयानंद गोरे, नगरसेवक सौरभ कासार, अर्चना दिघे यांच्यासह अधिकारी व स्वच्छता कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात या उपक्रमात सहभाग घेतला.

संगमनेर सेवा समितीच्या माध्यमातून आ. सत्यजीत तांबे यांनी शहराच्या विकासात स्वच्छता आणि अतिक्रमण मुक्त रस्ते याला प्राधान्य दिले होते. पालिकेत सत्ता आल्यानंतर त्यांनी दिलेल्या आश्‍वसनाची पुर्तता करण्याच्या दृष्टीने एकएक पाऊल उचलले आहे. दरम्यान गेल्या काही वर्षांत मालदाड रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झाले असून निवासी वसाहतींसह विविध उद्योग-व्यवसायांनी येथे बहर घेतला आहे. सुरुवातीला अरुंद असलेला हा रस्ता नगरपालिकेने दुहेरी करून हायमास्ट लाईट्ससह विकसित केल्यामुळे या भागाला नवे रूप प्राप्त झाले. मात्र वाढत्या वर्दळीबरोबर काही ठिकाणी अतिक्रमण, कचऱ्याचे ढिगारे आणि काटेरी झुडपांमुळे परिसराचे सौंदर्य मलिन झाले होते.

या पार्श्वभूमीवर नगरसेवक सौरभ कासार, अर्चना दिघे यांच्या पुढाकारातून नगर परिषदेकडून व्यापक स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. सोमवारी सकाळीच आ. सत्यजीत तांबे व नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, मुख्याधिकारी व स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पथक मालदाड रोड परिसरात दाखल झाले. या अभियानात जेसीबी, ट्रॅक्टरच्या साह्याने मोठ्या प्रमाणातील कचरा हटविणे, झाडाझुडपांची साफसफाई आणि अतिक्रमण हटविण्याचे काम करण्यात आले. काही तासांतच परिसराचा चेहरामोहरा बदलून पुन्हा एकदा मालदाड रोड स्वच्छ, सुटसुटीत आणि आकर्षक बनला.

परिसराची स्वच्छता ही आपली जबाबदारी असून नगरपालीका आपले कर्तव्य पार पाडणारच आहे. परंतू नागरीकांनी देखील आपला परिसर स्वच्छ रहावा, कचरा घंटा गाडीतच टाकावा, रस्त्यावर अतिक्रमण करू नये असे आवाहन यावेळी नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी केले.

या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, अशा प्रकारची नियमित स्वच्छता व देखभाल शहरातील विविध भागात झाली, अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई झाली तर शहराचा विकास अधिक प्रभावी ठरेल अशी अपेक्षा स्थानिकांनी व्यक्त केली. नागरिकांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या मोहिमेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# एजंटांपासून सावध रहा; योजनांचा थेट लाभ घ्या – आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील बांधकाम कामगारांसाठी आयोजित भांडी वाटप कार्यक्रमात आमदार अमोल खताळ यांनी राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करत एजंटांपासून सावध राहण्याचा इशारा दिला.




आमदार खताळ म्हणाले की, सध्याचे सरकार हे सर्वसामान्य, कामगार, शेतकरी, महिला आणि तरुणांचे सरकार असून प्रत्येक घटकाच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शासन काम करत आहे. तसेच पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात विविध विकासकामांना गती मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, शासनाच्या योजना या नागरिकांचा हक्क असून त्यासाठी कोणालाही पैसे देण्याची गरज नाही. कोणत्याही एजंटच्या माध्यमातून काम करू नका. त्रास दिल्यास थेट संपर्क साधा, संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

संगमनेर तालुक्यात नोंदणीकृत बांधकाम कामगारांची संख्या २४,१२६ असून विविध योजनांद्वारे हजारो कामगारांना लाभ मिळाला आहे. शिष्यवृत्ती योजनेतून ६,८७७ लाभार्थ्यांना सुमारे ७ कोटी ६० लाख रुपयांची मदत वितरित करण्यात आली आहे. तसेच सुरक्षा संच, अत्यावश्यक वस्तू संच आणि इतर योजनांचाही लाभ मोठ्या प्रमाणावर देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य सुविधांबाबत बोलताना, कामगारांसाठी संगमनेरमध्येच दवाखान्याची सुविधा उपलब्ध होणार असून तपासणी व उपचारासाठी बाहेर जाण्याची गरज भासणार नाही, मुला-मुलींनी शिक्षणाबरोबरच एमएससीआयटीसारख्या कौशल्य अभ्यासक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा उल्लेख करत त्यांनी लाडकी बहीण योजनेचा उल्लेख केला आणि काही विरोधकांनी या योजनेला विरोध केल्याचा आरोपही केला. सहाय्यक कामगार आयुक्त रेवनाथ भिसले, सरकारी कामगार अधिकारी स्वप्निल जाधव आणि दुकाने निरीक्षक ललित दाभाडे यांनी योजनांचे सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विविध पदाधिकारी, स्थानिक नेते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# महाराष्ट्र सरकारचा ऊर्जा व्यवस्थापनात एआय तंत्रज्ञान लागू करण्याचा निर्णय

मुंबई (वृत्तसंस्था)



महाराष्ट्र सरकारने ऊर्जा व्यवस्थापनात एआय तंत्रज्ञान लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ऊर्जा सुरक्षेबरोबरच, ५६ लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवून पर्यावरण संरक्षणावरही भर दिला आहे. महाराष्ट्रातील विजेची वाढती मागणी आणि भविष्यातील ऊर्जा आव्हानांना तोंड देण्यासाठी राज्य सरकारने आता आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात वीज निर्मिती आणि तिचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. सह्याद्री स्टेट गेस्ट हाऊस येथे झालेल्या एका महत्त्वाच्या आढावा बैठकीत, मुख्यमंत्र्यांनी ऊर्जा विभागाला व्यवस्थापन, देखभाल आणि दुरुस्ती यांसारख्या गुंतागुंतीच्या कामांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून मानवी चुका कमी होतील आणि यंत्रणा अधिक कार्यक्षम होईल.

उन्हाळ्यात विजेची विक्रमी मागणी अपेक्षित असल्याने, सरकारने टाटा पॉवर, अदानी पॉवर आणि बेस्ट यांसारख्या संस्थांच्या सहकार्याने एक सर्वसमावेशक कृती योजना विकसित केली आहे. बैठकीदरम्यान, मुख्यमंत्र्यांनी सांगितले की वीज निर्मितीसाठी कोळसा आणि पाण्याची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली आहे.मान्सूनपूर्व देखभालीची कामेही युद्धपातळीवर सुरू आहेत. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी, सरकारने कोयना जलविद्युत प्रकल्पातून १,८०० मेगावॅटपर्यंत वीज घेण्याची आणि गरज भासल्यास बाह्य स्त्रोतांकडून अतिरिक्त वीज खरेदी करण्याची तयारी केली आहे.

याव्यतिरिक्त, ग्रीड निकामी झाल्यास मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा खंडित होणे टाळण्यासाठी मुंबई आयलँडिंग योजना आणि राज्य भार प्रेषण केंद्राची बॅकअप प्रणाली देखील बळकट करण्यात आली आहे. ऊर्जा सुरक्षेबरोबरच, राज्य सरकारने पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दिशेनेही एक मोठे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र सरकारची धोरणात्मक सल्लागार संस्था 'मित्रा' आणि 'अर्थ डे नेटवर्क इंडिया' यांच्यात एक महत्त्वपूर्ण करार झाला आहे.

# अनुभवाचे अंतरंग' कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा दिमाखात, साहित्यप्रेमींची मोठी गर्दी




युवावार्ता (प्रतिनिधी )-

के. बी. दादा देशमुख सभागृहात चपराक प्रकाशन प्रकाशित आणि लेखक अशोक शेटे लिखित 'अनुभवाचे अंतरंग' या लघुकथा संग्रहाचा प्रकाशन सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या सोहळ्याला संगमनेर आणि परिसरातील साहित्यप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. यावेळी मार्गदर्शन करताना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी लेखक समाज बदलू शकतो ही भूमिका मांडत लेखणीच्या सामर्थ्यावर विश्वास व्यक्त केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी ग्रामीण साहित्यावर भाष्य करताना सांगितले की, ग्रामीण भागातून नवनवीन लेखक तयार झाले पाहिजेत, तरच खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य अधिक सक्षमपणे पुढे येईल. नव्या लेखकांच्या पाठीशी उभे राहण्याची ग्वाही देताना चपराक प्रकाशनाचे घनश्याम पाटील म्हणाले की, आजचे नवीन लेखक अतिशय दर्जेदार लिहित असून त्यांना आमच्या प्रकाशनातर्फे नेहमीच योग्य न्याय दिला जातो.


कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवताना शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले गुरुजी यांनी पुस्तकाचा सविस्तर आढावा घेतला आणि लेखक अशोक शेटे यांच्या प्रामाणिक स्वभावाचे व लेखनशैलीचे कौतुक केले. प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. कैलास दौंड यांनी शेटे यांच्या लेखणीचा गौरव करताना सांगितले की, लेखकाने आता इथून पुढे न थांबता अधिकाधिक सातत्याने लिहित राहिले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय गोर्डे यांनी केले. आर. पी. राहणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पुस्तकाचे सुंदर मुखपृष्ठ बनविल्याबद्दल अनुष्का वाकचौरे हिचा यावेळी गौरव करण्यात आला.

सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे समाजात निरपेक्ष भावनेने शैक्षणिक व सामाजिक कामात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला. तसेच स्व. संदीप डुबे यांच्या स्मरणार्थ जे. एन. व्ही. पेमगिरीसह विविध शाळांना वैद्यकीय संचाचे वाटप करण्यात आले. पाहुण्यांचे परिचय संदीप वाकचौरे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ घुले व अक्षय खतोडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शशिकांत आव्हाड यांनी मानले.

सोहळ्यासाठी माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, साहित्यिक व इतिहास संशोधक संतोष खेडलेकर, माजी पंचायत समिती उपसभापती मधुकर गुंजाळ, राजहंस दूध संघाचे संचालक रमेश गुंजाळ, माजी पंचायत समिती सदस्य रावसाहेब डुबे,अशोक हजारे, शाम्प्रोचे संचालक शांताराम डुबे, युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे, नायकचे संपादक गोरक्ष मदने, माजी प्राचार्य कैलास शेटे, विश्वनाथ शेटे, संताजी देशमुख, राहता पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी राजेश पावसे, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत, म. रा. प्रा. शि. संघ अहिल्यानगर शाखेचे जिल्हाध्यक्ष प्रवीण ठुबे, शिक्षक बँकेचे संचालक भाऊराव राहिंज, मा. चेअरमन किसन खेमनर, संतोष दळे, विकास मंडळाचे माजी अध्यक्ष भाऊ ढोकरे, म. रा. प्रा. शि. संघ संगमनेर शाखा महिला अध्यक्ष सुनीता घुले, मुख्याध्यापक प्रकाश गोडसे, दादाभाऊ चौधरी, शा. व्य. स. अध्यक्ष रायभान गुंजाळ तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# द्रमुक आणि काँग्रेसने महिला आरक्षण विधेयक मंजूर होऊ दिले नाही - अमित शाह

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी द्रमुक आणि काँग्रेसवर महिला आरक्षण विधेयकाबाबत गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी म्हटले की, या दोन्ही पक्षांनी संसदेत महिलांना सक्षम करणारे महिला आरक्षण विधेयक मंजूर होऊ दिले नाही.

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इरोड जिल्ह्यातील मोडक्कुरिची मतदारसंघात भाजप उमेदवार कृतिका यांच्या प्रचारसभेत बोलताना अमित शाह यांनी विरोधकांवर टीका केली. यावेळी कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. त्यांचा रोडशो शिवगिरी शासकीय रुग्णालय परिसरातून सुरू होऊन थिरुन चिन्नमलाई यांच्या पुतळ्याजवळ संपला. अमित शाह यांनी आपल्या भाषणात एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकारवरही निशाणा साधला. त्यांनी आरोप केला की, एम. करुणानिधी यांच्यापासून सुरू झालेली घराणेशाही आजही सुरू असून स्टॅलिन आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवण्याचा प्रयत्न करत आहेत.तसेच, एडप्पाडी के. पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली तामिळनाडूमध्ये मजबूत आघाडी उभी राहत असल्याचा दावा शाह यांनी केला. राज्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार आल्यास भ्रष्टाचार संपुष्टात येईल आणि तामिळनाडूची प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित होईल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा ताण

## मराठी शिक्षण धोक्यात – मा. आ. डॉ. तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील मराठी शाळा बंद करण्याचा शासनाचा अप्रत्यक्ष घाट सुरू असल्याची टीका माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केली. नेवासा तालुक्यातील दौऱ्यादरम्यान विविध शाळांना भेटी देताना त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील गंभीर समस्या अधोरेखित करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

या भेटीदरम्यान अनेक शाळांमध्ये शिक्षक व संस्थाचालकांमध्ये तीव्र नाराजी व उदासीनता दिसून आली. शिक्षक भरती न झाल्यामुळे अनेक ठिकाणी शिक्षकांची कमतरता निर्माण झाली असून, त्याचा थेट परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होत असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षकांचे मुख्य काम अध्यापनाचे असताना त्यांच्यावर विविध अशैक्षणिक कामांचा मोठा ताण टाकला जात आहे. वारंवार एकाच प्रकारची माहिती ऑनलाईन मागवली जात असल्याने शिक्षकांचा मौल्यवान वेळ वाया जातो आणि विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. याशिवाय, शिक्षण विभागातील काही अधिकारी किरकोळ कारणांवरून शिक्षकांना दमदाटी करतात तसेच छोट्या बाबींवर आर्थिक दंड आकारतात, हे प्रकार चिंताजनक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, अनेक शाळांना क्रीडा व कला शिक्षक उपलब्ध करून दिले जात नाहीत. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती बंद असून, शाळांना अपेक्षित अनुदानही मिळत नसल्याने आवश्यक सोयी-सुविधा निर्माण करण्यात अडचणी येत आहेत. शासनाने या सर्व बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा मराठी शाळांची परिस्थिती आणखी बिकट होईल, असा इशारा डॉ. सुधीर तांबे यांनी दिला.

# पेन्शन वितरणात विस्कळीतपणा

## काही सेवानिवृत्तांना पेन्शनपासून ठेवले वंचित - प्रमोद कुलट



युवावार्ता (प्रतिनिधी)


संगमनेर - अक्षयतृतीया सारख्या सणाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यातील सेवानिवृत्तांना पेन्शन वितरणात मोठा गोंधळ उडाल्याचा प्रकार समोर आला आहे. पंचायत समिती संगमनेर आणि अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक लि. शहर शाखेच्या समन्वया अभावी अनेक पेन्शनधारकांना वेळेवर पेन्शन मिळू शकले नाही.

मार्च महिन्याची पेन्शन एप्रिलमध्ये अदा करण्यासाठी जिल्हा परिषद अहिल्यानगरकडून अनुदान वर्ग करण्यात आले होते. त्यानुसार दि. १८ एप्रिल २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या शहर व तालुक्यातील शाखांमधून पेन्शन घेणाऱ्या धारकांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आली. मात्र, राष्ट्रीयकृत बँकांमधून पेन्शन घेणाऱ्या संगमनेर शहर व तालुक्यातील अनेक सेवानिवृत्तांना या प्रक्रियेतून वंचित राहावे लागले. संबंधित रक्कम राष्ट्रीयकृत बँकांकडे वर्ग करण्यात न आल्याने त्यांच्या खात्यात पेन्शन जमा होऊ शकली नाही. याबाबत नेमकी जबाबदारी कोणाची, याबाबत संभ्रम असून, पंचायत समितीने आवश्यक माहिती वेळेत बँकेला दिली नाही का? की सहकारी बँकेकडून निधी वर्ग करण्यात त्रुटी राहिली, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. पंचायत समिती संगमनेरच्या अर्थ विभागाने राष्ट्रीयकृत बँकांच्या नावे स्वतंत्र धनादेश न काढल्यामुळे ही अडचण निर्माण झाल्याचेही समोर येत आहे. परिणामी, मासिक सेवानिवृत्त वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन अनेकांच्या खात्यात जमा होऊ शकले नाही.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी संघटना, शाखा संगमनेरचे अध्यक्ष तथा जिल्हा शासन संपर्क प्रवक्ता अहिल्यानगर प्रमोद कुलट यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अक्षयतृतीया सारख्या सणाच्या दिवशी पेन्शनधारकांना उपाशी ठेवण्याचे काम प्रशासनाने केले आहे, अशी टीका त्यांनी केली. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या पेन्शनधारकांनी तत्काळ तोडगा काढून थकीत रक्कम लवकरात लवकर जमा करण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित जबाबदारांवर कारवाई करण्याचीही मागणी पुढे येत आहे.

# भोंदूबाबा खरातच्या पोलीस कोठडीत 23 एप्रिल पर्यंत वाढ

युवावार्ता (प्रतिनिधी))



नाशिक- शिकमधील भोंदूबाबाअशोक खरात याच्याविरोधात एकामागून एक गुन्हे दाखल होत असून, प्रकरण दिवसेंदिवस गंभीर होत आहे. महिला अत्याचार, फसवणूक, अमली पदार्थांचा वापर आणि धार्मिक भावना दुखावण्यासारखे आरोप त्याच्यावर करण्यात आले आहेत.

अशातच आता नाशिकमधील भोंदूबाबा याच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. महिला अत्याचाराच्या पाचव्या गुन्ह्याच्या चौकशीसाठी विशेष तपास पथकाने ताबा घेतल्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपी अशोक खरातला २३ एप्रिलपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.विशेष म्हणजे ही सुनावणी ऑनलाईन माध्यमातून झाली. यावेळी सरकारी वकिलाकडून खरातच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची मागणी करण्यात आली. पुढे सरकारी वकिलाने आपली बाजू मांडताना सांगितले की, खरातची गुन्हा करण्याची पद्धत जरी एकसारखी असली तरीही पीडित महिला प्रत्येकवेळी वेगवेगळी होती. मात्र महिलांना गुंगीचे पदार्थ देऊन आणि फसवणूक करून अत्याचार करण्यात आले असल्याचा आरोप आहे. या प्रकरणातील द्रव्यांचा वापर आणि संपूर्ण कटाचा तपास करण्यासाठी कोठडी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# बसस्थानकांवरील शौचालये १ जूनपासून मोफत

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त येत्या १ जूनपासून राज्यातील सर्व बस स्थानकांवरील शौचालय सुविधा प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकाच्या पाहणी दौऱ्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.

प्रवाशांकडून बसभाड्यातून स्वच्छता कर आधीच आकारला जात असल्याने आता हा खर्च महामंडळ स्वतः उचलणार आहे. यासाठी खासगी कंत्राटदारांकडून चालवली जाणारी शौचालय व्यवस्था बंद करून ती जबाबदारी महामंडळाकडेच देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या दौऱ्यावेळी राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाच्या प्रादेशिक व्यवस्थापक अमृता ताम्हणकर, विभागीय वाहतूक अधिकारी अनिल मेहतर तसेच स्थानिक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.दरम्यान, उपाहारगृहात गरजूंसाठी ३० रुपयांत चहा-नाश्ता देण्याची योजना कागदावरच असल्याचे आढळल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. ही योजना २४ तासांत सुरू करून त्याबाबतचे फलक दर्शनी भागात लावण्याचे आदेश त्यांनी दिले, अन्यथा संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा इशारा दिला.

# अवकाळी पावसाचा राज्यभर दणका

## विजांच्या कडकडाटासह मुसळधार सरी

पुणे (वृत्तसंस्था)

राज्यात अचानक हवामानात मोठा बदल पाहायला मिळत असून हिंगोलीसह मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. दिवसभर कडाक्याच्या उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला असला, तरी शेतकरी वर्गासाठी ही परिस्थिती धोक्याची ठरत आहे. वसमत, नांदेड, बुलढाणा, अकोला, बारामती आणि इंदापूर परिसरात पावसामुळे आंबा, केळी आणि इतर पिकांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी विजा कोसळण्याच्या घटना घडल्या असून सुदैवाने जीवितहानी टळली आहे. एकीकडे तापमान ४५ अंशांच्या जवळ पोहोचलेले असताना दुसरीकडे अचानक पडणाऱ्या पावसामुळे हवामानात मोठी उलथापालथ होत आहे. हिंगोली जिल्ह्यात सायंकाळनंतर अचानक वातावरण ढगाळ झाले आणि रात्रीच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. दिवसभर उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे गारवा मिळाला. मात्र, वसमत तालुक्यातील अनेक भागांमध्ये काढणीसाठी तयार असलेल्या आंबा बागांना मोठा फटका बसल्याची माहिती समोर येत आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

नांदेड जिल्ह्यात सर्वदूर वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. विजांच्या कडकडाटामुळे अनेक ठिकाणी भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ग्रामीण भागात शेतकऱ्यांची चिंता वाढली असून आंबा, केळी, हळद यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे शेतातील कामांवरही परिणाम झाला आहे.

विदर्भातील अकोला जिल्ह्यात एकीकडे तापमान ४५ अंशांपर्यंत पोहोचले होते, तर सायंकाळी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळल्या. यामुळे उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव आणि शेगाव परिसरात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची नोंद झाली. काही ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडल्याच्या घटनाही घडल्या.

# कुपोषण रोखण्यासाठी तातडीची गरज- ग्राहक पंचायत

अकोले (प्रतिनिधी)



अकोले आदिवासी तालुक्यातील 'सॅम' , 'मॅम' बालके व दुर्धर आजार असलेली बालके यांची संख्या वाढत असल्याने आवश्यकत्या उपाययोजना करण्याबाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे निवासी नायब तहसीलदार किसन लोहारे व तालुका पंचायत समितीचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी शिवराम डगळे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे, भाऊसाहेब आभाळे, राजेंद्र गवांदे यांनी दिली.

निवेदनात एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अकोले व राजुर या प्रकल्पांच्या माध्यमातून कुपोषित बालकांचे सातत्यांने सर्वेक्षण, सर्व्हे केले जाते व तालुका आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आणि ग्रामीण रुग्णालय अकोले येथील अधिनस्त कार्यरत आर. बी. एस. के पथक केंद्राच्या माध्यमातून प्रत्येक अंगणवाड्यांमध्ये बालकांची आरोग्य तपासणी केली जाते.

वाड्या-वस्त्यांमध्ये सर्वेक्षण करून कमी वजन व कमी उंची असलेले बालकांच्या शोध घेतला जातो. कमी वजनाच्या बालकांना नाचणी पासून बनवलेला आहार, पदार्थ तसेच गूळ, शेंगदाणे, लाडू व गावरान तूप, अमृत आहारामध्ये अंडी व केळी पोषण कल्पवडी, जीवनसत्व युक्तक्षार, सूक्ष्म पोषण तत्वे असलेले आहाराचे किट देण्यात येते व औषधउपचार करण्यात येतात.

पोषण अभियानाद्वारे पालक सभा, पोषण रॅली, महिला मेळावे व माता बैठका घेण्यात येतात. पोषण माह, महिना व पंधरवडा पोषण आहार अभियान राबवण्यात येते. अकोले तालुक्यात आदिवासी भागातील स्तनदा माता, गरोदर मातांना योग्य आहार देण्याचे नियोजन अंगणवाडीच्या माध्यमातून दिले जाते. आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी अनेक वर्षांपासून केंद्र सरकार, राज्य सरकार विविध उपाययोजना राबवत आहे. कोट्यावधी रुपये खर्च करते मात्र तो खर्च व्यर्थ झाल्याचे कुपोषण आकडेवारी मुळे उघड होत आहे व दिसत आहे.

बालविकास प्रकल्प अधिकारी अकोले व राजुर यांची जागा नेहमी वर्षे, दोन वर्षांपासून रिक्त असून प्रभारी अधिकारी यांच्याकडे चार्ज आहे तातडीने तेथे सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी. तसेच निवेदनात तालुक्यात ३८ बालके तीव्र कुपोषित, मध्यम कुपोषित गटात ३३८ तर १८ बालके दुर्धर आजाराने ग्रस्त, अकोले आदिवासी भागातील बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी तातडीने युद्धपातळीवर उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

निवेदनाच्या प्रति माहितीसाठी राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण,महिला बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, जिल्हा परिषद जिल्हा कार्यक्रम अधिकारी अहिल्यानगर तहसीलदार अकोले, पंचायत समिती अकोले, गटविकास अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफ्रुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरक्षित, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# मालपाणी सामुदायिक विवाह सोहळ्यात ४१ नवदाम्पत्य विवाहबंधनात

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

तीन दशकांची परंपरा असलेला येथील मालपाणी उद्योग समूहाच्या पुढाकाराने आयोजित भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा राज्याला दिशादर्शक आहे. पैशांच्या उधळपट्टीला आणि अनावश्यक थाटमाटाला फाटा देऊन अत्यंत शाही पद्धतीने विवाह साजरा होऊ शकतो, हे या सोहळ्याने वेळोवेळी सिद्ध केले आहे. केवळ गरीब, गरजू तरुण-तरुणी नव्हे, तर उच्चशिक्षित वधूवरही या सोहळ्यात विवाहबद्ध होण्यास प्राधान्य देतात, यातच या विवाह सोहळ्याचे मोठेपण सामावलेले आहे. संस्कारांची शिंपण करतानाच बचतीचा मंत्र आणि वृक्षारोपणाचे तंत्र नवदाम्पत्यांना सांगून त्यांच्याकडून वचन घेणारा हा सोहळा असंख्य परिवारांना दिशा देणारा क्रांतिकारक सोहळा ठरतो, असे उद्गार आ. अमोल खताळ यांनी काढले.

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर मालपाणी लॉन्स येथे मालपाणी उद्योग समूहाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २९ व्या सामुदायिक विवाह सोहळ्यात प्रमुख अतिथी या नात्याने मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे, नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, मालपाणी उद्योग समूहाचे चेअरमन राजेश मालपाणी यांच्यासह मालपाणी परिवारातील श्रीमती ललिता देवी, श्रीमती सुवर्णा काकी, डॉ. संजय, मनीष, गिरीश, जय, रचना, सुनिता व श्रेया मालपाणी आदी उपस्थित होते.

यावेळी आ. खताळ पुढे म्हणाले की, विवाह म्हंटले की मोठेपणाच्या हव्यासामुळे प्रचंड खर्च करण्याची मानसिकता असते. त्यामुळे अनेक परिवार कर्जबाजारी होतात. तीस वर्षांपूर्वीच मालपाणी परिवारातील स्व. ओंकारनाथजी (भाऊ) आणि माधवलालजी यांनी दूरदृष्टीने ही समस्या ओळखली. या बंधूंनी संगमनेरमध्ये सामुदायिक विवाह सोहळ्याच्या चळवळीची पायाभरणी केली. मालपाणी परिवारातील पुढच्या पिढीनेही हा वारसा उत्तम रीतीने जपल्यामुळेच राज्याच्या कानाकोपऱ्यातून तरुण-तरुणी विवाह करण्यासाठी या ठिकाणी येतात, ही अभिमानाची गोष्ट आहे.

आ. लहामटे यांनीया सोहळ्याची मुक्त कंठाने प्रशंसा केली. ते म्हणाले की, सामुदायिक विवाह ही काळाची गरज असून तिचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे. तीस




वर्षे सातत्याने ही चळवळ जिवंत ठेवण्याचे शिवधनुष्य मालपाणी परिवाराने पेलून दाखविले. सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून समाजाचे ऋण फेडण्याचा मालपाणी परिवाराचा हा प्रयत्न जनतेच्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे यशाच्या शिखरावर पोहोचला आहे.

नगराध्यक्ष डॉ. तांबे म्हणाल्या की, संगमनेरमध्ये विकसित झालेली सामुदायिक विवाहाची चळवळ हा प्रत्येकाच्याच अभिमानाचा विषय बनलेला आहे. आ. सत्यजित तांबे यांच्याशी माझा विवाह देखील याच सामुदायिक विवाह सोहळ्यात झाला असल्याने आमच्या पारिवारिक जीवनामध्ये या सोहळ्याला आगळे वेगळे महत्त्व आहे.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उद्योग समूहाचे संचालक डॉ. संजय मालपाणी यांनी मागील २९ वर्षांचा सामुदायिक विवाह सोहळ्याचा आढावा घेतला. आजपर्यंत या सोहळ्याच्या माध्यमातून सुमारे दीड हजार परिवार नात्यांमध्ये जोडले गेले आहेत. अनेक उच्चशिक्षित तरुण-तरुणी देखील या सोहळ्यामध्ये विवाहबद्ध झालेले आहेत. विवाह सोहळ्याने इतकी विश्वासार्हता कमावलेली आहे की, याच सोहळ्यात विवाह करायचा म्हणून अनेक जण वेटिंग लिस्ट मध्ये थांबतात. यंदा देखील वीसहून अधिक विवाह संख्येच्या मर्यादेमुळे स्वीकारणे शक्य झाले नाही. सातासमुद्रापार इंग्लंडहून खास वधूवरांना आशीर्वाद देण्यासाठी आलेले पाहुणे नीक क्रोक्स यांच्यामुळे हा सोहळा इंटरनॅशनल झाला आहे, असे उद्गार डॉ. मालपाणी यांनी काढले.इंग्लंडहून खास वधूवरांना आशीर्वाद देण्यासाठी आलेले पाहुणे नीक क्रोक्स यांच्यामुळे हा सोहळा इंटरनॅशनल झाला आहे, असे उद्गार डॉ. मालपाणी यांनी काढले. सलग तीस वर्षे मालपाणी परिवारावर विश्वास ठेवून वाढत्या संख्येने होणाऱ्या विवाहाबद्दल उद्योगसमूहाचे संचालक मनीष मालपाणी यांनी आभार प्रदर्शन करताना कृतज्ञता व्यक्त केली. मुरारी देशपांडे व राम पाटसकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

मालपाणी परिवारातील सर्व महिला सदस्यांच्या शुभहस्ते पाच दांपत्यांना प्रतिनिधी स्वरूपा रोपे सस्नेह भेट देण्यात आली. संसार देखील फुलवा आणि त्यासोबतच वृक्षांची जोपासना करा, असा संदेश देण्यात आला. त्याचेही उपस्थित हजारो मंडळींनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. श्रीमती सुवर्णा काकी मालपाणी यांनी आपल्या मधुर स्वरात स्वरचित मंगलाष्टक जेव्हा सादर केले, तेव्हा सभागृहात टाचणी पडली तरी आवाज ऐकू येईल इतकी शांतता पसरली होती. वधू-विवाह यशस्वी करण्यासाठी उद्योग समूहाचे व्यवस्थापक रमेश घोलप यांच्या नेतृत्वाखाली एकंदर २६ विविध प्रकारच्या समित्या नियुक्त करण्यात आल्या होत्या.

# जिल्ह्यात ३८४४ रुग्णांना ३१ कोटींची मदत

## मुख्यमंत्री फडणविसांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)–**



शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात आर्थिक वर्षात ३८४४ रुग्णांना सुमारे ३१ कोटी १९ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रुग्णालय, धर्मादाय रुग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यातील ३८४४ रुग्णांना सुमारे ३१ कोटी १९ लाख ७३ हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

# व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराची रक्कम शिक्षणासाठी अर्पण

## डॉ. गिते यांची सामाजिक बांधिलकी अधोरेखित

**शिबलापूर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

पिंपरी लौकी अजमपुर येथील व्यवसाय निमित्त पुण्यात येथे राहत असलेले डॉ. गीते यांनी समाजहिताची जाणीव जपत आणि शिक्षणाला हातभार लावण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र शासनाकडून प्रदान करण्यात आलेल्या 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' प्राप्त डॉ. सोमनाथ वेणूताई निवृत्ती गिते यांनी पुरस्काराची संपूर्ण रक्कम तसेच स्वतःची भर घालून एकूण रुपये ३२,००० शैक्षणिक संस्थांना देणगी म्हणून देण्याचा प्रेरणादायी निर्णय घेतला आहे.



या पुरस्काराची मूळ रक्कम रुपये १५,००० इतकी असताना, त्यामध्ये स्वतःकडून अतिरिक्त रक्कम जोडून त्यांनी शिक्षण क्षेत्रासाठी मोठा हातभार लावला आहे. स्वर्गीय आई वेणूताई व स्वर्गीय वडील निवृत्ती भाऊराव गिते यांच्या स्मरणार्थ प्रवरा माध्यमिक विद्यालय, शिबलापूर येथे रुपये ११,००० देणगी देण्यात आली.

यावेळी डॉ. गिते यांच्यासह प्राचार्य भारत दिवटे, सरपंच प्रमोद बोन्द्रे, माजी प्राचार्य आनंदाराव गिते, माजी प्राचार्य भिमराज बोन्द्रे, सुनील हिंगे सर, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश शिंदे तसेच इतर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. तसेच कुटुंबातील अर्जुन गिते, संतोष गिते, राऊसाहेब गिते, किरण गिते आणि अश्विनी गिते यांचीही उपस्थिती होती.

याशिवाय, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी जिल्हा परिषद शाळा, शिबलापूर यांनाही रुपये २१,००० देणगी देण्याची घोषणा डॉ. गिते यांनी केली.

पुरस्कारातून मिळालेली रक्कम स्वतःच्या उपयोगासाठी न ठेवता शिक्षणासाठी अर्पण करण्याचा निर्णय हा केवळ उदात्त विचार नव्हे, तर समाजाप्रती असलेली खरी बांधिलकी दर्शवणारा आहे. डॉ. गिते यांच्या या कार्यामुळे शिक्षण क्षेत्राला बळ मिळणार असून, त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

सरपंच प्रमोद बोन्द्रे म्हणाले : डॉ. गिते यांनी पुरस्काराची रक्कम स्वतःसाठी न वापरता शिक्षणासाठी अर्पण करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत प्रेरणादायी आहे. अशा कार्यातून समाजाला सकारात्मक दिशा मिळते. त्यांच्या या उपक्रमामुळे गावातील विद्यार्थ्यांना निश्चितच मोठा फायदा होईल.

प्राचार्य भारत दिवटे सर म्हणाले : डॉ. गिते यांची शिक्षणाविषयीची बांधिलकी आणि सामाजिक जाणीव खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यांनी दिलेली ही देणगी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरणार असून, त्यांच्या या कार्यामुळे इतरांनाही प्रेरणा मिळेल.

# डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचा आवाज कडूबाई खरात

एका साध्या एकताऱ्याच्या सुरातून उभं राहिलेलं आयुष्य, संघर्षातून घडलेली ओळख आणि गाण्याच्या माध्यमातून समाजाशी नातं जोडणारी एक स्त्री-ही आहे कडूबाई खरात यांची कहाणी. त्यांच्या आवाजात केवळ सूर नाहीत, तर जीवनाची झुंज, वेदना आणि जागृतीची ताकद दडलेली आहे.

सांदीकोपऱ्यात निपचित पडून असलेल्या एकताऱ्याला एका स्त्रीने पुन्हा जिवंत केलं, त्याला स्वर दिले आणि त्या स्वरांमधून तिने समाजाच्या वेदना व्यक्त केल्या. ही स्त्री म्हणजे कडूबाई खरात. तिच्या गळ्यातील सूर केवळ गाणं नसून ते आयुष्याच्या संघर्षाचं, उपासमारीच्या वेदनेचं आणि सामाजिक जाणीवेचं जिवंत चित्र आहे. एकतारीच्या साथीने ती जेव्हा भीमगीतं गाते, तेव्हा त्या गीतांचे शब्द ऐकणाऱ्याच्या मनात खोलवर उतरतात. तिचं गाणं केवळ मनोरंजन नसून ते प्रबोधन आहे, चळवळीच्या साचलेल्या प्रवाहाला हलवून टाकणारा एक प्रखर आवाज आहे.

पूर्वी भजनपरंपरेत एकतारीला विशेष स्थान होतं. महार समाजातही नाथपंथाच्या प्रभावाखाली काही लोक एकतारीच्या साथीने भजनं गात असत. श्रद्धा, उदरनिर्वाह आणि आत्मिक समाधान या तिन्ही गोष्टींचं साधन म्हणून हा एकतारा त्यांच्या आयुष्याचा भाग होता. मात्र धर्मांतरानंतर अंधश्रद्धा आणि जुन्या परंपरांपासून दूर जाताना हा एकतारा अनेक घरांत निपचित पडून राहिला. त्याची जागा पेटीने घेतली आणि भीमगीतांच्या माध्यमातून समाजजागृतीची नवी परंपरा सुरू झाली. या परंपरेत अनेक दिग्गजांनी योगदान



दिलं, पण काळाच्या ओघात या चळवळीचा जोम काहीसा कमी झाल्याचंही जाणवतं. अशा वेळी कडूबाई खरात यांच्यासारखी स्त्री पुन्हा एकदा एकताऱ्याला हातात घेते आणि त्यातून चळवळीचा आवाज बुलंद करते.

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील आवाणा गावात जन्मलेली कडूबाई ही तुकाराम कांबळे आणि तान्हुबाई यांची एकुलती एक मुलगी. तिच्याआधीची अपत्यं जगली नसल्यामुळे तिला 'कडू' हे नाव देण्यात आलं. लहानपणापासूनच आई-वडिलांसोबत भजनाला जाताना तिच्या आवाजाला आकार मिळू लागला. शिक्षणाची संधी न मिळालेली, आयुष्याच्या कठीण परिस्थितीत वाढलेली ही मुलगी पुढे संसारात पडली; मात्र पतीच्या निधनानंतर आणि त्यानंतर आई-वडिलांच्याही मृत्यूनंतर तिच्यावर जगण्याची जबाबदारी कोसळली. दोन मुलं आणि एका मुलीला सांभाळत तिने एकतारीच्या जोरावर आयुष्य पुढे नेण्याचा निर्णय घेतला.

जीवनाच्या या कठीण प्रवासात तिने औरंगाबाद गाठलं. चिकलठाण्यातील गायरान वस्तीत पत्र्याच्या घरात राहून ती आजही आपला संसार चालवते. सकाळी घराबाहेर पडून ती बौद्ध वस्त्यांमध्ये जाते, घराघरांत जाऊन गाणी गाते आणि जे मिळेल त्यावर गुजराण करते. तिचं गाणं केवळ भिक्षा मागण्याचं साधन नाही, तर ते समाजजागृतीचं माध्यम आहे. तुम्ही खाता त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही हाय असं सांगत ती समाजाला आपल्या इतिहासाची आठवण करून देते. शिक्षण, समता आणि स्वाभिमान यांचे संदेश ती आपल्या गीतांमधून पोहोचवते.

कडूबाईंचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कोणतंही औपचारिक संगीत शिक्षण घेतलेलं नाही. त्या कॅसेटवरची गाणी ऐकून, वाटेत कुणाचं गाणं ऐकून ते लक्षात ठेवतात आणि आपल्या शैलीत सादर करतात. त्यांच्या गाण्यातील हरकती, ताना आणि भावस्पर्शी सादरीकरण ऐकणाऱ्याला भारावून टाकतं. तिच्या आवाजात एक नैसर्गिक गोडवा आहे, जो कोणत्याही प्रशिक्षणाशिवायही प्रभावी ठरतो. त्यामुळेच सोशल माध्यमांवर तिचं गाणं वेगाने पसरलं आणि अनेकांच्या हृदयाला भिडलं.

मात्र या लोकप्रियतेच्या पलीकडे तिचं वास्तव अत्यंत कठीण आहे. पत्र्याच्या घरात राहणारी कडूबाई आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. वीज नाही, पाणी नाही, आणि रोजच्या जगण्यासाठी सतत संघर्ष आहे. तरीही ती स्वतःसाठी काही मागत नाही. तिची मागणी ही सामूहिक आहे-जिथे ती राहते, त्या वस्तीत राहणाऱ्या सर्वांसाठी मूलभूत सुविधा मिळाव्यात. तिच्या या विचारातून तिचा मोठेपणा दिसून येतो.

कडूबाई खरात यांचं आयुष्य हे केवळ एका स्त्रीचं संघर्षकथन नाही, तर ते समाजातील विषमता, दुर्लक्षित घटकांची



अवस्था आणि त्यातूनही उभा राहणारा स्वाभिमान याचं प्रतीक आहे. एकताऱ्याच्या साध्या सुरातून ती जेव्हा समाजाशी संवाद साधते, तेव्हा ते गाणं नसून एक चळवळ बनतं. तिच्या स्वरांमध्ये भूक आहे, वेदना आहे, पण त्याचबरोबर आशा आणि लढण्याची जिद्दही आहे.

आजच्या काळात, जेव्हा कला आणि संस्कृती अनेकदा केवळ व्यावसायिक चौकटीत अडकतात, तेव्हा कडूबाईंचं गाणं आपल्याला मूळाशी नेऊन ठेवतं. त्यांच्या स्वरांमधून आपल्याला जाणवतं की खरी कला ही जगण्याशी जोडलेली असते. कडूबाई खरात यांनी एकताऱ्याला दिलेला आवाज हा केवळ संगीताचा नाही, तर तो समाजजागृतीचा, संघर्षाचा आणि माणुसकीचा आवाज आहे.

संकलन
**– किशोर आव्हाड, उपसंपादक**
दैनिक युवावार्ता, संगमनेर

## संगमनेरमध्ये कडूबाई खरात यांचा भिमगीतांचा जल्लोष

संगमनेर(युवावार्ता प्रतिनिधी)-

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भिमगीत गायिका कडूबाई खरात यांच्या दमदार आवाजात सादर होणाऱ्या भिमगीतांच्या जल्लोषमय कार्यक्रमाचे आयोजन संगमनेर शहरात मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता संगमनेर शहर बसस्थानक परिसरात पार पडणार आहे. त्यांच्या गाण्यांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा आणि सामाजिक जागृतीचा संदेश दिला जाणार आहे.

कार्यक्रमात भव्य आतिषबाजी, लाईट शो आणि साउंड सिस्टीमची आकर्षक व्यवस्था करण्यात आली आहे. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून गोल्डमॅन रोहितदादा पिसाळ, समाजसेवक कुणालभाई सोनवणे आणि प्रदीप थोरात उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# संपादकीय...

## मराठी शाळांकडे नव्याने पाहण्याची गरज

मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर सुटकेचा आनंद दिसतो, कारण पुढील दीड-दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. मात्र, याच काळात पालकांच्या मनात वेगळीच धावपळ सुरू होते. आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणासाठी योग्य शाळेची निवड हा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहतो. विशेषतः पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये हा संभ्रम अधिक तीव्र असतो. आपल्या मुलाला मराठी माध्यमाच्या शाळेत घालायचे की इंग्रजी माध्यमाच्या शाळेत, यावर घराघरांत चर्चा रंगते. नातेवाईक, मित्रमंडळी आणि समाजातील विविध लोक आपापले सल्ले देतात, त्यामुळे पालक अधिकच गोंधळून जातात. इंग्रजी ही ज्ञानभाषा असल्याने मुलांनी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घेतले पाहिजे, अशी समजूत अनेकांच्या मनात घर करून बसलेली आहे; परंतु हाच विचार अनेकदा चुकीचा ठरतो. इंग्रजी भाषा आत्मसात करण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घेणे आवश्यक आहे, असे अजिबात नाही. मराठी माध्यमातून शिक्षण घेत असतानाही विद्यार्थी उत्कृष्ट इंग्रजी शिकू शकतो. आज देशातील अनेक उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ, साहित्यिक आणि नामवंत व्यक्ती मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनच मोठ्या पदांवर पोहोचले आहेत. याचा अर्थ असा की यशासाठी माध्यम नव्हे, तर गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्याची जिज्ञासा महत्त्वाची असते. जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांच्या शाळांमध्ये आजही दर्जेदार शिक्षण दिले जाते, हे वास्तव नाकारता येणार नाही. मराठी माध्यमाच्या शाळांनीही काळानुसार स्वतःमध्ये आमूलाग्र बदल केले आहेत. आज या शाळांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात असून ई-लर्निंग, क्टिव्हिटी बेस्ड लर्निंग यांसारख्या आधुनिक अध्यापन पद्धतींचा अवलंब केला जात आहे. अनेक शाळांनी आयएसओ नामांकन मिळवले असून डिजिटल स्कूल, टॅब स्कूल यांसारख्या संकल्पना रुजत आहेत. शिक्षकवर्गही अत्यंत प्रशिक्षित आणि तंत्रस्नेही आहे. डी.एड., बी.एड., एम.एड. सारखी उच्च शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक विविध अध्यापन तंत्रांचा वापर करून विद्यार्थ्यांना समजेल अशा पद्धतीने शिक्षण देतात. त्यामुळे गुणवत्तेच्या बाबतीत मराठी शाळा कुठेही कमी पडत नाहीत. याचे ठोस उदाहरण म्हणजे शिष्यवृत्ती परीक्षांचे निकाल. पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक असते. अलीकडेच घोषित झालेल्या जवाहर नवोदय परीक्षेच्या निकालातही याच शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर यश मिळवले आहे. मंथन, प्रज्ञाशोध यांसारख्या स्पर्धा परीक्षांमध्येही मराठी शाळांचे विद्यार्थीच आघाडीवर असल्याचे दिसते. ही बाब मराठी माध्यमाच्या शिक्षणाची गुणवत्ता अधोरेखित करणारी आहे. याशिवाय, सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अनेक सुविधा मोफत दिल्या जातात. मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार आणि विविध शिष्यवृत्त्या यामुळे पालकांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होतो. शिक्षण हा अधिकार आहे, व्यवसाय नाही, ही भावना या शाळांमध्ये जपली जाते. सहशालेय उपक्रमांमध्येही मराठी शाळा आघाडीवर आहेत. सहली, वनभोजन, क्षेत्रभेटी, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी यांसारख्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. अलीकडच्या काळात मराठी माध्यमाच्या शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला आहे. ग्रामीण भागात तर इंग्रजी माध्यमातील काही विद्यार्थीही मराठी शाळांकडे वळताना दिसत आहेत. अनेक शाळांमध्ये सेमी-इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले असून सीबीएसईसारख्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणीही होत आहे. त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण आता मराठी शाळांमध्येही उपलब्ध आहे. तरीदेखील, शहरांमधील अनेक पालक इंग्रजी शाळांच्या झगमगाटाला भुलत आहेत. खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी शिक्षणाचे व्यापारीकरण केले आहे, हे वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही. केजीच्या प्रवेशासाठी लाखोंची देणगी, विविध निधी, वर्षभर चालणारे कार्यक्रम यांद्वारे पालकांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे उकळले जातात. अनेक ठिकाणी शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते, जी कायद्याच्या विरोधात आहे.

# सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटचा १००% निकाल



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिटयूटमध्ये आयसीयू टेक्निशियन या अभ्यासक्रमाच्या मार्च २०२६ परीक्षेचा १००% टक्के निकाल लागला असून, विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत नंदिनी शिंदे यांनी ८३.२५% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच विनोद गाडेकर यांनी ८०.००% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला असून, अनुष्का मोरे यांनी ७९.७५% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे.

सर्व विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन १००% निकालाची परंपरा कायम ठेवली असून, या यशाबद्दल संस्थेचे संचालक सागर लुंकड व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रम, सातत्य आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाल्याचे मत यावेळी दिलीप गालफाडे यांनी व्यक्त केले.

सिद्धी पॅरामेडिकल इन्स्टिटयूट ही पॅरामेडिकल क्षेत्रात उत्कृष्ट शिक्षण देणारी संस्था असून, विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी सक्षम बनवत आहे.

# संगमनेर येथे महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर येथे महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात श्री. व सौ. तोरकडी यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेची आरती करून झाली. चैतन्य लोणकर स्वामी यांनी विधिवत पूजा करून कार्यक्रमाला धार्मिक वातावरण निर्माण केले होते. यावेळी मृणाल बागडे हिने महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन व कार्यावर प्रभावी भाषण केले. तिने बसवेश्वरांनी दिलेला समता, सामाजिक न्याय आणि मानवतेचा संदेश उपस्थितांना समजावून सांगितला.

या वेळी सुभाष जंगम, ज्ञानेश्वर कथले, हेमंत तांदळे, दिलीप कबाडे, विलास लोणकर, बाळासाहेब जंगम, निलेश दिनकर, पूनम तांदळे, भीमाशंकर तांदळे, गणेश जंगम, निखिल तांदळे, संजय बागले, ज्ञानेश्वर वाकचौरे, दत्तात्रय मुर्तडक, अशोक लोणकर, सोमेश लोणकर, मंगेश सालपे आदी लिंगायत जंगम समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थितांनी महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# श्रीसाई मंदिरात साईसच्चरित्राचे पारायण आणि लघुरुद्र अभिषेक




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर शहराची जीवनवाहिनी असलेल्या प्रवरा नदीच्या विलोभनीय तीरावर वसलेल्या श्रीसाई मंदिरात अक्षय तृतीया आणि मंदिराच्या ३८ व्या वर्धापनदिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या मंगलमयी दिनाचे औचित्य साधून श्रीसाई बाबांच्या मूर्तीवर 'लघुरुद्र अभिषेक' करण्यात आला, ज्याने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त पहाटेपासूनच विविध धार्मिक विधींना सुरुवात झाली. यामध्ये: श्रीसाई बाबांच्या मूर्तीवर विधिवत लघुरुद्र अभिषेक आणि मंगल आरती करण्यात आली. या खास प्रसंगी श्रीसाईसच्चरित्राच्या ५३ अध्यायांचे सामूहिक पारायण करण्यात आले. मोठ्या संख्येने भाविकांनी या पारायणात सहभाग नोंदवून साईचरणी लीन झाले.

अक्षय तृतीयेचा मुहूर्त आणि मंदिराचा वर्धापनदिन असा दुग्धशर्करा योग जुळून आल्याने सकाळपासूनच भाविकांनी प्रवरा तीरावर दर्शनासाठी गर्दी केली होती. अभिषेक आणि आरतीनंतर उपस्थित सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. प्रवरा नदीच्या शांत परिसरातील या सोहळ्याने संगमनेरच्या आध्यात्मिक वैभवात भर घातली आहे. मंदिर व्यवस्थापन आणि स्थानिक भाविकांच्या सहकार्याने हा ३८ वा वर्धापनदिन सोहळा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
PRAVIN SAHEBRAO MORE
TO NEW NAME AS
PRAVEEN BABASAHEB MORE
BY AFFIDAVIT NO 497/2026
DATE 20/04/2026

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
SAYYED BHAIYA ALIMOHAMAD
TO NEW NAME AS
BHAIYA ALIMOHAMMAD SAYYAD
ADD- SAHARA COLONY, KOLHEWADI ROAD, TAL - SANGAMNER 422605

**नावात बदल**

मी संगीता मनोज बोरसे रा. संगमनेर, माझे लग्नापूर्वीचे सर्व दाखल्यावर संगीता रघुनाथ गीते असे नाव आहे. दर लग्नानंतर माझे नाव संगीता मनोज बोरसे असे झाले असून दोन्ही नावाच्या व्यक्ती (प्रतिज्ञापत्र) एकच आहे

CorelDRAW Ps Ai Id
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**धन्वंतरी**
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
वाटचाल तीन दशकांची
**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com






MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**We Are Hiring** SANGAMNER
Marketing Team
**SLH Tax Advisors Pvt Ltd**
Marketing Manager - 1 (25k to 50k+ Incentive)
Marketing Executive - 5 (20k to 35k + Incentive)
Digital Marketing - 1 (15k to 25k + Incentive)
Telecaller (Female) - 1 (15k to 20k + Incentive)
Salary + Incentives
Fast Growth Opportunity
Address - SLH Advisors Pvt Led, Saish Business Park,Behind Joshi Palace, Sangamner
Call/WhatsApp- 7264804000

**We Are Hiring...** FEMALE STAFF ONLY
Accountant (Tally, Financial Reporting)
Telecaller (Communication, Sales)
WALK-IN INTERVIEW
Dates: 21st - 22nd April 2026
Time- 9 AM To 4 PM
Interview Venue - LTC Office, Krushi Utpanna Bazar Samiti, Sangamner, Shop No. 15/16
Company Address: LTC Industries Survey No. 47, Plot No. 141-144, Sangamner MIDC, Sangamner, Dist. Ahilyanagar - 422605.
Send Your Resume On Whatsapp
CONTACT- 9975367595/9143304304

**पाहिजेत**
अनुभवी स्त्री/ पुरुष
सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता - मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**गाळा विकणे आहे**
२४५ स्क्वे.फुट आर.सी.सी. बांधकाम असलेला चैतन्यनगर येथील गाळा विकणे आहे
9405261738
9822315031

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**रॅक विकणे आहे**
सुपर शॉपी, किराणा दुकान, मेडिकल किंवा इतर दुकानांसाठी लागणाऱ्या रॅक आणि काउंटर विकणे आहे
(सर्व मटेरियल नवीन आहे फक्त दोन महिने वापर झाला)
9881855547

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर...
आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
**साई मंगल लॉन्स**
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता- समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क- प्रताप गोडगे
9890924380

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता - तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# एसटी प्रवासात 'डिजिटल' खोळंबा

## सुट्या पैशांच्या वादाने प्रवासी हैराण

लोणी
(युवावार्ता प्रतिनिधी)-

सर्वसामान्यांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'लालपरी', अर्थात एसटी बसचा प्रवास सध्या प्रवाशांसाठी एका वेगळ्या अनुभवांची शिदोरी असणारा ठरू लागला आहे. राज्य परिवहन महामंडळाने एसटी बसच्या भाड्यात १७.५ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतल्यामुळे प्रवाशांना आता खिशाला अधिक कात्री लावावी लागत आहे. मात्र, एकीकडे प्रवास महाग झाला असताना, दुसरीकडे महामंडळाची ऑनलाईन यूपीआय पेमेंट सेवा अचानक ठप्प झाल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. आजच्या डिजिटल युगात जवळपास ७० ते ८० टक्के प्रवासी तिकीट काढण्यासाठी फोन-पे किंवा गुगल-पे सारख्या ऑनलाईन सेवांचा वापर करतात, परंतु ऐन वेळी ही सेवा बंद पडल्याने प्रवाशांना मोठा आर्थिक आणि मानसिक फटका बसत आहे.



गेल्या काही वर्षांत डिजिटल पेमेंटची सवय झाल्यामुळे अनेक प्रवाशांच्या खिशात पुरेशी रोख रक्कम नसते. अशा परिस्थितीत प्रवासादरम्यान यूपीआय सेवा चालत नसल्याने विद्यार्थी वर्ग आणि महिला प्रवासी, नागरिक यांची मोठी तारांबळ उडत आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांनाही सुट्या पैशांसाठी कसरत करावी लागत आहे. एसटीमध्ये ही सेवा बंद असल्याने वाहक आणि प्रवाशांमध्ये सुट्या पैशांवरून खटके उडत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे प्रवासाचा आनंद पूर्णपणे निघून गेला असून, कधी कधी वादावादीचे प्रकार होत आहेत.

ऑनलाईन यूपीआय सेवा ठप्प झाल्यामुळे प्रवाशांना केवळ तिकीट काढणेच कठीण झाले नसून, संपूर्ण प्रवासात कुठे पैसे देण्याचा आणि ऑनलाईन पेमेंट बाबत हा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्य परिवहन महामंडळ ही सुविधा पुन्हा कधी सुरू करणार आणि सर्वसामान्य प्रवाशांची या त्रासातून कधी सुटका होणार, असा प्रश्न आता जनता विचारत आहे. भाडेवाढ करूनही जर मूलभूत डिजिटल सुविधा मिळत नसतील, तर प्रवाशांनी ही अडचण कशी दूर करावी, अशी विचारणा होत आहे. ही तांत्रिक अडचण तातडीने दूर करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता सर्वसामान्य प्रवासी वर्गातून केली जात आहे.

# नेवासा नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांवर गोळीबार

## उपनगराध्यक्षांच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल

नेवासा (प्रतिनिधी)-

नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्यावर गोळीबार केल्याच्या आरोपावरून संजय लक्ष्मण सुखदान (रा. नेवासा) याच्याविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय सुखदान हे नेवासा नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षांचे पती आहेत.

मुख्याधिकारी निखिल फराटे यांनी अहिल्यानगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करून तो तपासासाठी नेवासा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्याची माहिती नेवासा पोलीस ठाण्याचे निरीक्षक महेश पाटील यांनी सांगितले. आरोपी संजय सुखदान याचा शोध घेत असल्याची माहिती त्यांनी दिली.

गोळीबाराची घटना दि. १३ एप्रिलच्या रात्री पावणेआठच्या सुमारास घडली. मात्र मुख्याधिकारी फराटे यांनी काल, शनिवारी सायंकाळी तोफखाना पोलिसांकडे फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करून तो नेवासा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. आपण घाबरलो असल्याने लगेच तक्रार दिली नाही, असे मुख्याधिकारी फराटे यांनी नमूद केले आहे.

मुख्याधिकारी फराटे यांनी फिर्यादीत म्हटले की, संजय सुखदान यांनी यापूर्वीही नियमबाह्य कामासाठी दबाव आणला होता, त्यास नकार दिल्यानंतर त्याने चप्पल उगारून मारहाणीचा प्रयत्न केला होता. तसेच आम्ही सांगू तसे काम केले नाही, तर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही दिली होती.

दि. १३ एप्रिलच्या सायंकाळी नगरपंचायत कार्यालयात चर्चा सुरू असताना संजय सुखदान तेथे येऊन शिवीगाळ करत, तू बाहेर ये, आज तुला बघतोच, अशी धमकी दिली. त्यानंतर आपण कार्यालयीन कामकाज आटोपून अहिल्यानगरकडे निघालो असताना संजय सुखदान याने त्याच्या बुलेट मोटरसायकलने आपल्या चारचाकी वाहनास धडक दिली. त्यानंतर पुढे खोलेश्वर मंदिर चौकाजवळ वाहन आडवे लावून गावठी कट्ट्यातून आपल्या दिशेने गोळीबार केला. आपण खाली वाकल्याने गोळी चुकली. दुसरी गोळी झाडताना गावठी कट्ट्याचा ट्रिगर अडकल्याने आपण बचावलो.

आपण घाबरलो असल्याने तत्काळ तक्रार दाखल केली नाही, मात्र आरोपी संजय सुखदान याचे काही साथीदार पाठलाग करत असल्याचे लक्षात आल्याने फिर्याद दिली, असेही नमूद केले आहे.

# जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी २४ एप्रिलपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

अहिल्यानगर (जिल्हा माहिती अधिकारी)-

समाजाच्या विकास प्रक्रियेत युवकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा मानला जातो. युवकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने राज्य शासनाच्या युवा धोरण २०१२ अंतर्गत जिल्हास्तर युवा पुरस्कार दिला जातो. सन २०२५-२६ या वर्षासाठी पात्र युवक-युवती व संस्थांनी दि. २४ एप्रिल २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे. या पुरस्कारासाठी १३ ते ३५ वयोगटातील युवक-युवती तसेच नोंदणीकृत संस्था पात्र आहेत. अर्जदाराचे वय १ एप्रिल रोजी किमान १३ वर्षे पूर्ण आणि ३१ मार्च रोजी कमाल ३५ वर्षे असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने संबंधित जिल्ह्यात किमान पाच वर्षे वास्तव्य केलेले असावे. अर्जासोबत केलेल्या सामाजिक कार्याचे पुरावे (वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, छायाचित्रे इ.) जोडणे बंधनकारक आहे. पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे सामाजिक कार्यात सक्रिय राहण्याबाबत हमीपत्र सादर करणे आवश्यक पात्र युवक-युवती व संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून प्राप्त करून घ्यावेत आणि निर्धारित मुदतीत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# शेख शबाना सलीम यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-



अँग्लो उर्दू हायस्कूल विद्यालयातील शिक्षिका शेख शबाना सलीम यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष अँग्लो उर्दू हायस्कूल चे चेअरमन शेख गनी हाजीसेठ हे होते. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शेख शबाना सलीम यांच्या विषयी आपले प्रेम व्यक्त करतांना सांगितले की, त्या आई सारखे प्रेम करणाऱ्या शिक्षिका आहे. मुख्याध्यापक शेख मुनव्वर खलीलु रहेमान यांनी त्यांच्या काम विषयी सांगितले की, ते अत्यंत होतकरू व न थकणारे अशी त्यांची ओळख होती.

खान शाहरुख आसिफ यांनी ही त्यांच्या स्वभावा विषयी माहिती देतांना सांगितले की, ते एक कष्टाळू, मेहनती व तज्ञ मार्गदर्शक होते. तसेच खान साजिद दिलावर सर, अब्दुल्ला भाई चौधरी यांनी ही त्यांची प्रशंसा करून त्यांचे कामाचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमात संस्थेचे चीफ ट्रस्टी अब्दुल्ला हाजी हसन चौधरी, सचिव हाजी पठाण शौकतखान मोहम्मद खान, ट्रस्टी शेख नजीर ताज मोहम्मद, हाजी शेख एजाज शमशोद्दीन, साजिद खान हसन खान पठाण, शाळेचे सेवानिवृत पर्यवेक्षिका शेख अनिसा अब्दुल मजीद, काझी सईदा एजाज (माजी मुख्याध्यापिका), शेख परवीन नूर मोहम्मद (माजी मुख्याध्यापिका), तसेच शेख शबाना सलीम यांचे नातेवाईक तसेच अंजुमन प्रायमरी उर्दू शाळे चे शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी, नगर पालिका शाळा क्रमांक ४ चे सर्व शिक्षिका व अँग्लो उर्दू हायस्कूल चे सर्व शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# भारती चौधर (केकाण) यांना पीएचडी पदवी प्रदान

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-



सौ. भारती चौधर (केकाणे) या आनंदवन विद्यालय घुलेवाडी या शाळेतील उपशिक्षिका असून, यांना नुकतीच सावित्रीबाई फुले विद्यापीठाची पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी संस्कृत विषयात 'संस्कृत साहित्यातील नीतिकथांमधील मानवेतर प्रतीके व त्यांचे मूल्यशिक्षणातील महत्त्व - एक उपयोजनात्मक अध्ययन' या विषयावर प्रबंध सादर केला असून, त्यांना संगमनेर महाविद्यालयातील संस्कृत विभाग प्रमुख डॉ. अनिरुद्ध मंडलिक यांचे मार्गदर्शन लाभले.

सौ. चौधर मॅडम यांनी या अगोदर एम.फिल पदवी प्राप्त केली असून, त्या संस्कृत विषयात सेट पास आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संगमनेर महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड सर, शिक्षण प्रसार संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजयजी मालपाणी तसेच विद्या प्रबोधिनी संस्थेचे सर्व पदाधिकारी, आनंदवन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका फटांगरे मॅडम यांनी अभिनंदन केले.

# कौठवाडी यात्रेत डोक्यावर पेटत्या कठ्यांची परंपरा कायम

राजूर
(प्रतिनिधी)-



राजूर येथून जवळच असलेल्या कौठवाडी गावामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून परंपरागत भरणारी कठ्याची यात्रा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडली. डोक्यावर मडके (कठे) घेतलेले भाविक, मडक्याला छिद्रे पाडून, मडक्यात उकळलेले तेल टाकून नवस फेडणारे व बोलणारे भाविक, हे दृश्य रात्रीच्या अंधारात उठून दिसत होते. रात्रभर उत्साहात व पेटत्या कठ्यांच्या उजेडात परिसर उजळून काढणारी ही यात्रा पाहण्यासाठी, तसेच देवाला नवस बोलण्यासाठी राज्यभरातून लोकांनी येथे गर्दी केली होती. गावात बिरोबादेवाचे मंदिर आहे. कठ्याच्या यात्रेमुळे हे गाव सर्वदूर प्रसिद्ध झाले आहे. नगर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, धुळे, कल्याण, विदर्भातून लोकांनी येथे यात्रेसाठी गर्दी केली होती. कोणतेही काम पूर्ण होण्यासाठी देवाला 'कठा' लावून नवस बोलला जातो. हा नवस पूर्ण होत असल्याची भाविकांची श्रद्धा आहे.

कठा म्हणजे मडक्याची घागर. मडक्याची वरची बाजू कापून, त्यात खैर, साग, चंदन अशी विविध प्रकारची लाकडे व समिधा टाकून घागर पूर्ण भरतात. त्यात गोडेतेल टाकून चांगली भिजवतात. घागरीच्या चोहोबाजूंनी पांढरे शुभ्र कापड गुंडाळून, वरच्या टोकाला मंदिरासारखा आकार करतात. हे कठे बिरोबा मंदिरात ठेवतात. साकिरवाडी येथून सात वाजता मानाची काठी येते व बिरोबा की जय अशा घोषात ढोल, ताशांच्या गजरात कठे पेटविले जाऊन यात्रेला सुरूवात होते.

मंदिराभोवती उघड्या अंगाने, डोक्यावरून संपूर्ण शरीरावर वाहत असलेले तेल, डोक्यावरचा अग्नी, अशा वातावरणात हे दृश्य पाहणाऱ्यांच्या अंगाला काटा येतो. यंदा ५८ कठे पेटविले होते. भाविकांची संख्याही वाढत असल्याची माहिती दत्ता भोईर यांनी दिली. त्यांनी यथोचित पूजा करून सामुदायिक आरती केली. साकिरवाडी येथून मानाच्या काठीचे आगमन झाले. बिरोबा की जय म्हणत मंदिराभोवती ५ फेरे मारून भाविकांनी नवस फेडले. यावेळी काही अनुचित प्रकार घडू नये, राजूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विलास माळवदे, चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# निळवंडे धरण व कालवे पूर्ण करुन लाभक्षेत्रातील सर्वांना पाणी देणे हे जीवनाचे उद्दिष्ट - माजी मंत्री थोरात

संगमनेर (प्रतिनिधी)-



सतत काम करून दुष्काळी भागाला वरदान ठरणारे निळवंडे धरण व कालवे, संगमनेर शहरासाठी थेट पाईपलाईन योजना, तालुका शेजारी विमानतळ, नियोजित नाशिक पुणे रेल्वे, यांसह राज्यातील सर्वोत्कृष्ट सहकारी संस्था, शिक्षण संस्था आणि शांतता सुव्यवस्था असलेला सज्जन व विकसित तालुका ही संगमनेर तालुक्याची ओळख निर्माण केली आहे. निळवंडे धरण व दोन्ही कालवे पूर्ण करून दुष्काळी भागातील प्रत्येक शेतकऱ्याला पाणी देणे हे जीवनाचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तरुणांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना दिली असून, युवकांच्या सर्व प्रश्नांना त्यांनी अत्यंत दिलखुलास उत्तरे दिली. संगमनेर तालुका युवक काँग्रेस व एनएसयुआयच्या वतीने आयोजित युवा संगम या कार्यक्रमात युवक काँग्रेसच्या युवकांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीत त्यांनी अत्यंत मनमोकळेपणाने उत्तरे दिली. यावेळी आपल्या महाविद्यालयीन कार्यकाळाबाबत माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, विद्यार्थी दशेमध्ये विविध आंदोलनांमध्ये सहभागी घेतला, याचबरोबर विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने पुढाकार राहिला. पुण्यात लॉ कॉलेजचे जनरल सेक्रेटरी पद भूषविले. यामधून मोठा मित्रपरिवार निर्माण झाला.

आंदोलन हा स्थायीभाव असल्याने मीटर हटाव, टेंभे आंदोलन, मराठवाडा नामांतर आंदोलन, निळवंडे पाणी प्रश्न आंदोलन अशा विविध आंदोलनांमध्ये सहभाग राहिला. या मधून ९ दिवसांचा कारावास सुद्धा झाला. निळवंडे धरण पूर्ण करणे हे जीवनाचे ध्येय होते. १९९२ ला निळवंडे धरणाचे काम सुरू झाले. मात्र ९५ ते ९९ या काळात हे काम थांबले होते. १९९९ नंतर कॅबिनेट मंत्रीपद मिळत असताना सुद्धा निळवंडे कामासाठी राज्यमंत्रीपद मागून घेतले. अनंत अडचणीवर मात करून निळवंडे धरण पूर्ण केले. २०१२ मध्ये भिंत पूर्ण झाली. डावा व उजवा कालव्यांची कामे पूर्ण केली. सर्व शेतकऱ्यांना पाणी देणे हे आपल्या जीवनाचे उद्दिष्ट आहे. काम पूर्ण आपण केले. मात्र पाणी वाटपासाठी आपण नाही. याचबरोबर संगमनेर शहरासाठी आलेली शुद्ध पाण्याची थेट पाईपलाईन योजना, तालुक्याजवळ झालेले काकडी विमानतळ, शांतता, सुव्यवस्था, बंधुभाव असलेला संगमनेर तालुका, उत्कृष्ट सहकारी व शिक्षण संस्था, समृद्ध ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सुकून असलेली संगमनेर शहर ही ओळख आपण निर्माण केली. १९८६ मध्ये पठार भागातील कोटमारा धरणासाठी थेट पंतप्रधान राजीव गांधी यांना पत्र लिहून या धरणासाठी वन विभागाची जमीन आपण मिळवली. नाशिक पुणे सरळ रेल्वेसाठी सातत्याने पाठपुरावा केला. यामधून रेल्वे करता ५६० कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले. त्यावेळेस जीएमआरटीची कोणतीही अडचण नव्हती. आता मात्र संगमनेर तालुक्याची प्रगती रोखण्याकरता या अडचणी निर्माण केल्या जात आहे. पण काही झाले तरी रेल्वे नियोजित मार्गानेच होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सध्या राजकारणामध्ये जातीयता आणि रंगद्वेष वाढला असून, आपण वारकरी संप्रदाय व राज्यघटना मानणाऱ्या विचाराचे आहोत. राजकारण हे जनतेच्या विकासासाठी करायचे असते. असे सांगताना सत्ताधाऱ्यांनी राजधर्माचे पालन केले पाहिजे. मात्र सध्या ते होत नसल्याची टीका त्यांनी केली. याचबरोबर महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण नंतर शरद पवार पर्व असल्याचे सांगताना वडीलधाऱ्यांचा मान ठेवून राजकारण झाले पाहिजे. मात्र प्रसिद्धीसाठी कशीही टीका केली जाते, हे अत्यंत दुर्दैवी आहे. राजकारणामध्ये कधीही व्यक्तीदोष नसावा. तालुक्याच्या विकासाची वाटचाल कायम ठेवण्याकरता ज्येष्ठ व तरुणांनी एकत्र येऊन आपली परंपरा जपावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी रॅपिड फायरसह विविध प्रश्नांना अत्यंत मनमोकळेपणाने माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिलखुलास उत्तरे दिली. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा आयोजक डॉ जयश्रीताई थोरात यांनी केले. यावेळी संगमनेर तालुक्यातील युवक व युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लव्ह जिहादसारख्या प्रकारांविरोधात सर्वांनी एकत्र यावे - हर्षा ठाकूर




संगमनेर (प्रतिनिधी)-

लव्ह जिहाद, लँड जिहाद पाठोपाठ आता 'कॉर्पोरेट जिहाद'सारखा प्रकार नुकताच नाशिकमध्ये उघडकीस आला आहे. लव्ह जिहादच्या नावाखाली तुमच्याच आया-बहिणींना खोट्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून फसविण्याचे प्रकार सुरू आहेत. ते हाणून पाडण्यासाठी सर्व हिंदू धर्मीय समाजबांधवांनी एकत्र येणे काळाची गरज आहे, असे आवाहन नांदेडच्या प्रखर हिंदुत्ववादी वक्त्या हर्षा ठाकूर यांनी केले.

तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे आयोजित हिंदू महासंमेलनामध्ये मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर आ. अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, जुन्नर येथील सुनील काळे, अयोध्या येथील राजश्री महंत एकनाथ महाराज, देविका जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शोभायात्रा काढण्यात आली.

ठाकूर म्हणाल्या की, हे जिहादी लोक वेगवेगळ्या व्यवसायांच्या माध्यमातून हिंदू मुलींना आपल्या खोट्या प्रेमाच्या जाळ्यात फसवत आहेत. त्यांच्यापासून सावध राहणे गरजेचे आहे. आत्तापर्यंत या जिहादींनी मोठ्याप्रमाणात हिंदू मुलींना लव्ह जिहादच्या माध्यमातून फसविले आहे. लव्ह जिहाद हा हिंदू धर्माला लागलेली फार मोठी कीड आहे. त्याचा बिमोड करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. काळे म्हणाले की, हिंदू धर्मात मूळतः कधीच जातीय तेढ नव्हती, परंतु काहींनी जातीय तेढ निर्माण करण्याचे काम केले. देशाचे विभाजन करण्यासाठी हे मोठे षड्यंत्र रचले गेले आहे. इतिहासाचे पुनर्लेखन, समाजातील जागरूकता व स्वाभिमान जागविण्यावर भर देणे गरजेचे आहे.

हिंदू संमेलन घेण्यामागील भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघटक अक्षय थोरात यांनी स्पष्ट केली, तर आभार भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष काशिनाथ पावसे यांनी मानले. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शुभम उपाध्याय यांच्या 'वंदे मातरम'ने संमेलनाची सांगता झाली. या हिंदू संमेलनास हिवरगाव पावसा, चंदनापुरी, आनंदवाडी, झोळे, गणेशवाडी, रायतेवाडी, खांडगाव, सावरगाव तळ, शिरापूर, निमगाव टेंभी, देवगाव, जाखुरी, संगमनेर खुर्द या गावांतील हिंदू समाजबंधू व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पॅनल देणे आहे

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पॅनल देणे आहे



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# संगमनेर नगरपालिकेकडून मोकाट जनावरांविरुद्ध मोहीम



छाया - प्रसाद सुतार, संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरात गेल्या काही दिवसांपासून वाढलेला मोकाट जनावरांचा वावर आणि त्यामुळे होणारे वाहतुकीचे अडथळे लक्षात घेता, संगमनेर नगरपालिकेच्या आरोग्य विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. विशेष म्हणजे या मोहिमेत पालिकेच्या कर्मचाऱ्यांसोबत बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनीही सक्रिय सहभाग घेत मोकाट जनावरांना पकडण्यासाठी मदत केली. शहरातील मुख्य रस्ते आणि बाजारपेठेत मोकाट जनावरांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले होते. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत नगरपालिकेने या जनावरांचा बंदोबस्त करण्याचा निर्णय घेतला. आज करण्यात आलेल्या कारवाईत अनेक जनावरांना पकडून नगरपालिकेच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीमध्ये सुरक्षितपणे चढवण्यात आले.

जनावरांना पकडणे आणि त्यांना वाहनात चढवणे हे जिकिरीचे काम असल्याने, संगमनेर नगरपालिकेने बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांचे सहकार्य घेतले. या कार्यकर्त्यांनी पालिकेच्या आरोग्य विभागाला मोलाची मदत केली. पकडण्यात आलेल्या जनावरांची रवानगी सुरक्षित ठिकाणी कर्हेघाटातील पांजरपोळ येथे करण्यात आली आहे. येथे जनावरांची चांगली व्यवस्था घेण्यात येते. या मोहिमेमुळे शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला असून, यापुढेही अशीच कारवाई सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अहिल्यानगरमध्ये कारवाई

## बनावट तंबाखू कारखाना उध्वस्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - स्थानिक गुन्हे शाखेने एमआयडीसी हद्दीतील गजराजनगर येथे सुरू असलेला बनावट सुगंधीत तंबाखू तयार करण्याचा कारखाना उध्वस्त करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून सुमारे १३ लाख ९२ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पथक शहर व एमआयडीसी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना माहितीदारामार्फत गजराजनगर परिसरात एका घरामध्ये सुगंधीत तंबाखू तयार करण्याचा अवैध कारखाना सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी राजेश बडे यांना सोबत घेऊन पथकाने तत्काळ छापा टाकला. कारवाईदरम्यान तीन जण प्रत्यक्ष तंबाखू तयार करताना आढळून आले. त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांची नावे असिफ खुदाबक्ष तांबोळी (वय ५०, रा. मुकुंदनगर), जफर चाँद शेख (वय ३८, रा. मुकुंदनगर) आणि दाऊद बाबुमियाँ शेख (वय ४२, रा. भिंगार) अशी असल्याचे समोर आले.

या छाप्यात ६०० किलो सुगंधीत तंबाखू, तंबाखू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे तीन मिक्सर, पॅकिंगसाठी तीन मशिन्स, १५ किलो रंग, चुना, पॅराफिनसारखी रसायने, एअर कंप्रेसर, वजनकाटा, ९० हजार रुपयांचा बनावट किवाम, सहा इलेक्ट्रिक मोटारी, बनावट स्टिकर्स, पिशव्यांचे रोल तसेच एमएच १७ व्ही ७०० क्रमांकाची टाटा सफारी गाडी असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांसह अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रम्हानंद लहरी प्रगट केली । - संत नामदेव महाराज
श्री ज्ञानेश्वरी साप्ताहिक निरूपण
॥ श्रीज्ञानेश्वरी ॥
निरुपणकार - ह.भ.प. आचार्य अरुण महाराज फरगडे
प्रत्येक गुरूवारी सायंकाळी ५.३० वाजता
ठिकाण - श्री ज्ञानेश्वर मंदिर, उपासनी गल्ली, घासबाजार, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
ह.भ.प. आचार्य अरुण महाराज फरगडे

# निझर्णेश्वर देवस्थानचा परिसर मुख्य पर्यटन केंद्र ठरेल - ना. विखे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मंदिराचा जीर्णोद्धार तसेच परिसरात विकसित होत असलेल्या बिबट सफारी प्रकल्पामुळे श्री क्षेत्र निझर्णेश्वर देवस्थानचा परिसर संगमनेर तालुक्यातील मुख्य पर्यटन केंद्र ठरेल, असा विश्वास जलसंपदा तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

निझर्णेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराचा शुभारंभ अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर मंत्री विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी प्रवरा बँकेचे उपाध्यक्ष मच्छिंद्र थेटे, कैलास तांबे, तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस उपअधीक्षक कुणाल सोनवणे, वन विभागाचे अमरजीत पवार यांसह मंदिराच्या विश्वस्त समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

निझर्णेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी निधीची कमतरता भासणार नाही, परंतु लोकांचा सहभागही यामध्ये राहिला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून मंत्री विखे पाटील म्हणाले, हे देवस्थान आता भाविकांसाठी श्रद्धेचे मुख्य केंद्र झाले आहे. मागील काळात मंदिराच्या परिसरात विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्यामुळे परिसराचा चेहरामोहरा बदलला आहे.

भविष्यात मंदिराचे काम पूर्ण होईल, त्यावेळी या तीर्थस्थानाची भव्यता अधिक वाढेल. या परिसरात असलेल्या वन विभागाच्या जागेवर बिबट सफारी प्रकल्प उभारण्यात येत असून, याचा आराखडाही आता तयार झाला आहे. बिबट सफारी प्रकल्पामुळे पर्यटकांची संख्याही या भागात वाढेल. मध्यंतरी राजस्थान सरकारने उभारलेल्या काही व्याघ्र प्रकल्पांना भेट दिली, त्या प्रकल्पांच्या धर्तीवरच या परिसरातही असे प्रकल्प सुरू करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. पर्यटन वाढल्यामुळे या भागात रोजगाराच्या संधीही निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार अमोल खताळ म्हणाले, तालुक्यातील विविध विकासकामांसाठी महायुती सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता होत आहे. या विकास प्रक्रियेला पालकमंत्री विखे पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून, तालुक्यातील देवस्थानांच्या परिसर विकासासाठी निधी उपलब्ध होत असल्यामुळे तालुक्यातील तीर्थक्षेत्र पर्यटनाच्या कामाला चांगली गती मिळाली आहे. निझर्णेश्वर देवस्थानचा परिसर भविष्यात विकास प्रक्रियेचे एक मुख्य केंद्र ठरेल, असे त्यांनी सांगितले.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) अॉपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिशमनाय
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
अॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25